# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई
# प्रेसनोट

CB/46/2025

गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक ०९.०८.२०२५

..............................................................................................................

**"हॅपी फिगर स्पा, शॉप नंबर ०३, प्लॉट नंबर १४, स्पाईस अॅव्हेन्युव को.हौ.सो, सेक्टर ०८, उलवे येथे मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायातुन ४ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका"**

..............................................................................................................

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि श्री.पृथ्वीराज घोरपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत दिनांक ०८/०८/२०२५ रोजी "हॅपी फिगर स्पा, प्लॉट नंबर १४, स्पाईस अॅव्हेन्युव को.हौ.सो., सेक्टर ०८, उलवे येथे ४०००/-रूपये घेवुन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडुन जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली."

वपोनि/घोरपडे यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास हॅपी फिगर स्पा, प्लॉट नंबर १४, स्पाईस अॅव्हेन्युव को.हौ.सो., सेक्टर ०८, उलवे या ठिकाणी पाठवुन बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरून दिनांक ०८/०८/२०२५ रोजी १७.३७ वाजता पथकाने छापा टाकला असता सदर ठिकाणी ४ महिला मिळुन आल्या. नमुद स्पाची मालकीन जयश्री अस्लम पटेल ऊर्फ जयश्री विठोबा बुवाजी, वय ३५ वर्षे हिने ४ पिडीत महिलांना बॉडी मसाज करण्याचे नावाने प्राप्त करून त्यांना नमुद शॉप वेश्याव्यवसायाकरीता वापरून बेकायदेशीर आणि अनैतिक प्रयोजनार्थ पिडीत मुलीना वेश्याव्यवसाय करणे कामी लावून स्वतःला जाणिव असताना देखिल त्यांना वेश्या व्यवसायासाठी बनावट ग्राहकास दाखवून त्याचे मार्फत व्यवसायाचा मोबदला म्हणून ४०००/- रूपये स्विकारून त्याच्याकडुन वेश्याव्यवसाय करवून घेवून पिडिताचे कमाईवर स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आली. महिला आरोपी विरूध्द उलवे पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं ५१/२०२५, बीएनएस कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये दिनांक ०९/०८/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास उलवे पोलीस ठाणे करत आहे.

**सदर गुन्हयात महिला आरोपी हिला दिनांक ०९/०८/२०२५ रोजी ०३.४१ वाजता अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक १३/०८/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.**

सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त सो, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, मपोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/१३२ मांडोळे, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३४५२ कोलते, पोशि/३०६१ चव्हाण, पोशि/४५४४ पाटील, पोहवा/२५०१ अडकमोल, पोहवा/२५०७ पावडे तसेच चालक पोहवा/हान्डे हे सहभागी होते.

★★★★★★★★★★★